# कर्करोगाचा सामना करण्यासाठी महिलांनी सजग व्हावे!



रत्नागिरी■

कर्करोगाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. हा

पाहिजे. त्यासाठी महिलावर्गाने सजग व्हावे, असे आवाहन जागतिक पातळीवर कॅन्सरवर काम करणारे तज्ज्ञ डॉ. चैतन्य कोपीकर यांनी केले. यावेळी त्यांनी अन्य महिलांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फाऊंडेशन, पुणे येथील प्रशांती कॅन्सर केअर मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरीत 'कर्करोग निदान आपल्या दारी' हा उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमाचे उद्घाटन मंगळवारी फिनोलेक्स कॉलनी येथे चिरायु हॉस्पीटलच्या सर्वेसर्वा व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुनीता चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. हा उपक्रम १७ ते २० डिसेंबर या कालावधीत गोळप व परिसरात राबविण्यात येणार आहे. (पान २ वर)

## महिलांनी सजग व्हावे!

या कार्यक्रमाला मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, प्रशांती केअर मिशनच्या संचालिका लालेह बुशेरी उपस्थित होत्या.

फिनोलेक्स इंडस्ट्रिज लिमिटेड आणि मुकुल माधव फाऊंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून चिरायु हॉस्पीटल येथे स्त्रियांच्या स्तनाच्या कर्करोगाचे निदान केंद्र सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी लागणारे मॅमोग्राफी मशीन फिनोलेक्स इंडस्ट्रिजतर्फे देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

फिनोलेक्सच्या गोळप येथील कॉलनीच्या महिला मंडळाने महत्त्वाचा पुढाकार घेतला होता. यावेळी रक्षदा अन्सारी, डॉ. ज्योती चव्हाण, संचालक एस.एस. मठ, ए.बी. अत्रे, श्री. तातुगडे, डॉ. आशुतोष मुळ्ये, टी.के. काकडे, सागर चिवटे, गौरी क्षीरसागर, अभिषेक साळवी आदी उपस्थित होते.